सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
**Ph.No** : (0721) 2573027, 2572577 **Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**कालमर्यादीत**

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२५/ 1480
दिनांक :- 26 MAY 2025

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तूशास्त्र पदविका संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील पदविका अभ्यासक्रमांच्या केन्द्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत.**

**संदर्भ :-** मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्र. :- १०/एडीएम/Intake Approval/२०२५/१९२ दिनांक २२/५/२०२५.

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकान्वये आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तूशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेची माहीती अचुक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. सदर माहिती आवश्यक कागदपत्रे सादर करुन माहिती अद्ययावत करण्याबाबत संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये या कार्यालयास कळविलेले आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता संबंधीत शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई सलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती ऑनलाईन अद्ययावत करुन आवश्यक कागदपत्रासह सोबत जोडलेल्या **जिल्हानिहाय वेळापत्रक** जोडलेले असून त्यामध्ये आपणास दिलेल्या दिनांकास या कार्यालयात आवश्यक मान्यतेच्या पत्रासह प्रत्यक्ष उपस्थित राहून माहिती अद्ययावत करुन घ्यावी.

सदर माहिती प्रवेशासंबंधी असलयाने माहिती संवेदनशीलता व कालमर्यादा लक्षात घेता ती विहीत कालावधीत व अचुक असण्याबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. याबाबत https://dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर माहिती भरण्यासाठी ऑनलाईन प्रणाली उपलब्ध करुन देण्यात येत असून या प्रणालीवर सर्व संस्थांनी सोबत जोडलेल्या परिपत्रकात संस्थेकरीता दिलेल्या सुचने प्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

मंजूर प्रवेश क्षमतेची माहिती ही प्रवेश प्रक्रियेदरम्यान जागावाटपात दर्शविण्यात येणार असल्याने सदर माहितीत कोणतीही चुक झाल्यास व पर्यायाने प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचण उदभवल्यास त्यास सर्वस्वी संबंधीत संस्थेचे प्राचार्य जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

सदर विषयाबाबत संबंधीतांनी करावयाच्या कार्यवाहीसंबंधी विस्तृत सुचना सोबत जोडलेल्या आहे.

**सहपत्र :-** वरील प्रमाणे.

**(मनोज म अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर.** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता तसेच सदरचे पत्र संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

# प्रपत्र

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तूशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत संस्थांनी या कार्यालयात उपस्थित राहावयाचक वेळापत्रक

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | जिल्हा | उपस्थित राहावयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तूशास्त्र पदविका अभ्यासक्रम | बुलढाणा | ०९/०६/२०२५ |
| २ | | वाशिम | १०/०६/२०२५ |
| ३ | | यवतमाळ | ११/०६/२०२५ |
| ४ | | अमरावती | १२/०६/२०२५ |
| ५ | | अकोला | १३/०६/२०२५ |

**(मनोज म अंधारे)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.